सं. ठाणें
काव्य
२३४८



REFBK-0022337
REFBK-0022337

# सायंतारा

कवयित्री
विमल बी. गोडबोले

# सा यं ता रा

( काव्यसंग्रह )

काव्य
संदर्भ
22336
291454
2371

कवयित्री :

**विमल बी. गोडबोले**

REFBK-0022337
REFBK-0022337

**किंमत सात रुपये**

प्रकाशक :
विमल बी. गोडबोले,
७ बी, विसनजी पार्क,
नायगांव क्रॉस रोड,
दादर, मुंबई नं. १४.

□

मुखपृष्ठाचे डिझाईन :
चित्रकार श्री. ग. आ. गांगल
जी. डी. आर्ट

□

सर्व हक्क माझी स्नुषा,
सौ. मंगला प्रकाश गोडबोले
हिच्या स्वाधीन
६।१४ गोद्रेज हिल कॉलनी
विक्रोळी, मुंबई ४०००६९

□

मुद्रक :
श्री. गो. शि. सोहनी,
यशवंत प्रिंटींग प्रेस,
७४४, धर्मपुरी, वाई.
( जि. सातारा )

# अर्पण पत्रिका

माझी प्रीय आत्या –

डॉ. श्रीमती कृष्णाबाई फडके हिला

**'सायंतारा'**

हा माझा तिसरा काव्य संग्रह

मी प्रेमपूर्वक अर्पण करीत आहे.

प्रिय गुजूताई–

तूं माझ्यावर फार फार माया केलीस. माझे किती कौतुक केलेस.
वेळोवेळी मला मदत केलीस. माझ्या प्रत्येक अडचणीत
मला पाठबळ दिलेस. – त्याचे मोल मी कसे
विसरूं ? कातडयाचे जोडे करून घातले तरी
हे ऋण कधी फिटणार नाहीं. म्हणूनच
'सायंतारा' हा माझा काव्यसंग्रह
तुला अर्पण करतांना मला
अतिशय आनंद
होत आहे.

– विमल बी. गोडबोले

# — आभार —

'सायंतारा' हा माझा काव्यसंग्रह छापताना ज्यांनी ज्यांनी मला मदत केली त्यांची मी फार फार आभारी आहे.

सर्वप्रथम सुप्रसिद्ध कवि – कविवर्य श्री. मंगेश पाडगांवकर ह्यांच्या अतिसुंदर प्रस्तावनेबद्दल मी त्यांचे आभार मानते. श्री. मंगेश पाडगांवकर ह्यांची माझी जरासुद्धा ओळख नसतानाही त्यांनी आपल्या सगळ्या उद्योगांतून, व्यवसायांतून वेळ काढून – मी विनंती करतांच प्रस्तावना देण्याचे कबूल केले व 'आस्वाद' ही आपली अतिसुंदर व नीटनेटकी प्रस्तावना अगदी अल्पावधीत मला सादर केली व मला ऋणी केले. मी त्याबद्दल त्यांना धन्यवाद देते व त्यांचे आभार मानते.

माझे मित्र चित्रकार श्री. ग. आ. गांगल ह्यांनी केलेल्या सुंदर डिझाईनबद्दल व इतर सर्व मदतीबद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी आहे.

माझे निकटचे आप्त – प्राचार्य अच्युत केशव भागवत प्राचार्य, वाई आर्टस् व कॉमर्स कॉलेज व त्यांची पत्नी सौ. मीरा भागवत ह्यांनी तर प्रुफे तपासायचे अवघड काम करून माझे केवढे श्रम वाचविले. त्या उभयतांच्या ह्या अमोल सहाय्याबद्दल मी त्यांचीही ऋणी आहे.

आमचे मित्र चित्रकार श्री. पां. द. पारसनीस ह्यांनी दिलेल्या प्रोत्साहनाबद्दल व वेळोवेळी दिलेल्या अमोल सहाय्याबद्दल मी त्यांचीही अत्यंत ऋणी आहे.

शेवटी यशवंत प्रिंटिंग प्रेसचे श्री. गो. शि. सोहनी ह्यांनी अल्पकाळांत केलेल्या सुंदर व नीटनेटक्या मुद्रणाबद्दल त्यांची व त्यांच्या सहकाऱ्यांचीही मी आभारी आहे.

आणखीही ज्यांनी ज्यांनी मला सहाय्य केले त्या सर्वासर्वांचे मी आभार मानते.

– विमल बी. गोडबोले

# पुढेंच जायचें —



**विमल बी. गोडबोले**, कवयित्री

'सायंतारा' हा माझा तिसरा काव्यसंग्रह. गेल्या वर्षभरांत रचलेल्या ह्या पन्नास नवीन कविता आहेत. पहिल्या 'अंतरंगांत' लिहिलेलें प्रेमकाव्य ह्यांत फारच माफक प्रमाणांत आहे. आज आतां आयुष्याचा उत्तरार्ध कंठीत असतांना श्रांत मनाच्या ह्या थंड सावल्या आहेत असें समजा. तरूणपणीची गुर्मी तरूणपणाचा ताठरपणा आतां

संपुष्टांत आला आहे. हो, खरेंच तें–मन कितीही धांवलें तरी शरीर त्या बरोबर कसे धांवेल आतां ? हें करूं तें करूं म्हणतांना मन मात्र उत्साही असतें, धांवतें–पण हें थकलें शरीर मात्र मागें मागेंच ओढत असते क्षणोक्षणीं. जणू मनाचे लगाम खेंचून त्याला थांबवायला भाग पाडतें. आणि मी उदास होते--निराश होते. पण हतबल होणें मात्र मला पसंत पडत नाहीं. मनांत निश्चय करतें--नाहीं हें होणें नाहीं. हटायचें नाहीं आतां, पुढेंच जायचें. कांसवाच्या गतींनें कां होईना पण पुढेंच जायचें. आणि मग मन शांत होतें व शरीराला साथ देत आपली गति मंद करते.

आज आजूबाजूला पसरलेली अशांतता मनाला थोडी तरी अशांत करणारच आणि मग ते विचार काव्यांत थोडेसे तरी प्रति--बिंबित होणारच. त्यामुळे ह्या माझ्या कवितांचें स्वरूप थोडेसें बद--ललेलें असल्यास नवल तें काय ? तारुण्यांतील स्वप्नें काय वार्ध--क्यांतही दिसतील ? आज, आतां आयुष्यांत शिथिलता आलेली असली तरी मनाला एकप्रकारची तृप्ती आली आहे-- तशीच ग्लानीहि आहे. दृष्टीसमोरच्या सर्व सृष्टीवर धुक्याचें आवरण आलेलें वाटतें. कोठेंही भडकपणा नाहीं. चित्रवैचित्र्य नाहीं. तर सारें कसें शांत आहे. पण त्याबरोबरच मनावर उदासिनतेचें पटल आलें आहे. ह्या सगळ्या बदललेल्या परिस्थितीचा काव्यावर परिणाम झाल्याविना कसा राहिल ?

तारूण्य संपल्यानंतर -- जबाबदारीच्या जिवनांतून मोकळी हवा मिळाल्यानंतरही--मनाला एकप्रकारची ग्लानी आलेली असतें--अशा वेळेला 'आपलं कुणी नाही' अशी जाणीव साहजिकच उद्भवते--

वाढीस लागते आणि इथूनच साऱ्या उदासीनतेचा आरंभ होतो. ही उदासीनता मग जन्म देते त्या अशा थोड्याश्या उदासीन काव्याला. परंतु मनांत जे विचार चाललेले असतात त्यांचे प्रतिबिंब ह्या काव्यांत पडणारच. कोणाला आवडो न आवडो पण मनाविरूद्ध जायची ताकद माझ्यात नाहीं. कारण मला दांभिकपणा आवडत नाहीं. माझे मनचे विचार मी माझ्या काव्यांत प्रकट करते आणि तेव्हांच मला त्या काव्यापासून समाधान वाटतें--आनंद वाटतो.

प्रिय वाचक ह्या पन्नास नवीन कविता-- सायंताराच्या रूपाने मी आज आपल्या पुढे ठेवीत आहे. 'सायंतारा' म्हणजे संध्याकाळचा तारा खरा--पण तो शुक्रतारा खचित नव्हे, वार्धक्यांतील माणसाला मी ही उपमा दिली आहे हं आपली. हा स्वानुभव आहे. तेव्हां हा 'सायंतारा' आपल्या पसंतीस उतरो येवढीच मी आशा करते.

– ***विमल बी. गोडबोले.***

७ बी, विसनजी पार्क,
नायगांव क्रॉस रोड,
दादर, मुंबई १४

# सायंतारामधील कविता—


१ रसिका– !
२ सायंतारा
३ दिव्यत्वाची अमर ज्योत तूं
४ ह्या शांत शांत समयीं–
५ जायचें पलिकडे
६ जोगिया
७ भैरवी
८ वेडया मना–
९ अभिमान
१० अहंकार
११ हा गार गार वारा–
१२ मज हवी शांतता–
१३ तीं सरली स्वप्नें–
१४ यशोदायिनी–
१५ पैलतीरावर–
१६ सुकली पुष्पें–
१७ वैभव–
१८ क्षितिजावरतीं–
१९ उंच कडयावर–
२० सृष्टीचे वैभव
२१ सागरा! –
२२ सूर्यास्त–
२३ रात्रीच्या समयीं–
२४ आई– !
२५ ये गरजत मेघा–
२६ हे मातृभूमि–
२७ कशाला नीज ती यावी
२८ जाग आली मानवाला
२९ रंग असावे–
३० पाठलाग–
३१ एका सायंकाळीं
३२ संध्या–छाया
३३ थांब जरा–
३४ विश्वास
३५ कोकिळेस–
३६ निशिगंध–
३७ सांवल्या–
३८ दूर जा– दूर जा–
३९ चांदणे–
४० या छबडयांनों–
४१ क्षण आला आला–
४२ स्वर आले कानावर–
४३ मज नको–
४४ कर माझे जुळती–
४५ हा वाजत गाजत आला–
४६ सूर जुळुनि आले–
४७ नकळत–
४८ घर
४९ येथवरी प्रवास झाला–
५० शेवटीं–

# आस्वाद

श्रीमती विमल बी. गोडबोले ह्यांच्या कवितांचा ‘ सायंतारा ’ हा तिसरा संग्रह आहे. या संग्रहापूर्वी ‘ स्मृतिशलाका ’ आणि ‘ अंतरंग ’ हे त्यांचे दोन कवितासंग्रह प्रकाशित झालेले आहेत.

कलेची उपासना ही विमलाबाईंचे सर्व जीवन व्यापून टाकणारी प्रेरणा आहे. चित्रकला, संगीत आणि काव्य या तीनही कलांची साधना त्या आजवर करीत आल्या आहेत. त्यांची ही साधना खऱ्याखुऱ्या अर्थाने निरपेक्ष आहे. कसल्याही तऱ्हेचा लौकिक हपाप यामागे नाही. रंग, स्वर, शब्द यांच्या सहवासात निर्मळ आंतरिक समाधान त्यांना लाभते. अंतःकरणात निर्माण होणारे विविध भावतरंग ‘ सायंतारा ’ या संग्रहातील पन्नास कवितांतून त्यांनी व्यक्त केले आहेत. हे करीत असताना त्यांच्या मनांत अपेक्षा असलीच तर एकच आहे; रसिकांनी ही कविता आपली म्हणावी. आपण निर्माण केलेली कलाकृती रसिकांना आवडेल किंवा नाही अशी हुरहुर नेहमीच कलावंताला वाटत असते

अर्पित आहे तुमच्या चरणीं
काव्यफुले ही धुंद होउनी,
स्वीकारावी प्रमुदीत मनी
आशा आहे हीच मन्मनी

अशा नम्र भावनेने विमलाबाईनी रसिकांसमोर आपल्या कविता ठेवल्या आहेत. माझे साधेभोळे अंतःकरण या कवितांत मी कणाकणाने ओतले आहे असे त्या म्हणतात.

शंकित मन परि माझे होई
पसंत पडतिल काय तुम्हा ही ?

अशी हुरहुर त्यांना वाटते. या रसिकचरणी अर्पिलेल्या फुलांना आकर्षक रंगगंध कदाचित् नसेल. पण त्या फुलांत निर्मळ भाव आहे असे विमलाबाईंचे आवर्जून सांगणे आहे. 'सायंतारा' हा कवितासंग्रह वाचताना त्यातील हा निर्मळ भाव सर्वत्र जाणवतो. या फुलांत स्वतःकडे रसिकांची नजर वेधून घेण्यासाठी उभा केलेला नटवा दिमाख नाही. निर्मळ भावना समईच्या शांत, स्निग्ध ज्योतीप्रमाणे या कवितांतून तेंवत आहेत. आणि हेच या कवितांचे सामर्थ्य आहे.

आयुष्याच्या उत्तरार्धात लिहिलेल्या या कविता आहेत. या कवितांत सायंकाळच्या सावल्यांची उदासता दिसणे अगदी स्वाभाविक आहे. 'सायंतारा' ही कविता या भावनेचे प्रतीक होऊन अवतरते. हृदयाला भिववणाऱ्या संध्याकाळच्या सावल्या पसरलेल्या असतांना हा सायंतारा उगवतो. त्याचा प्रकाश डोळे दिपविणारा किंवा जग उजळून टाकणारा नाही. विमलाबाईंच्या काव्यप्रकृतीप्रमाणेच त्याचा प्रकाश सौम्य-शांत आहे. या सायंताऱ्याचे क्षितिजाशी हितगूज चालते तेही "मूक मूक भाषेत." स्वतःकडे लक्ष वेधून घेण्याचे तंत्र माहित नसलेल्या किंवा त्याची गरज वाटत नसलेल्या सायंताऱ्याची जगाला तमा नाही. जग आपल्याच नादात चूर आहे. परंतु हेच जग--

रुणझुणु पैंजण वाजत पायी – आली नाचत तारा
आणि जगाचा नूर बदलला बघता बघता सारा

जगाची ही रीत सायंताऱ्याला ठाऊक आहे.

सायंतारा पहात होता सगळे सगळे काही
मनातून हो खिन्न परीही बोलत काही नाही.
मूक जाहली भाषा, झाली निस्तेज नजरही त्याची
पण क्षितिजावर लहर जातसे चमकुन क्षण तेजाची

जगातल्या सुखलोलुप वृत्तीच्या पार्श्वभूमीवरही हा सायंतारा तेजाची लहर क्षणभर उजळतो. हा सायंतारा विमलाबाईंच्या काव्यवृत्तीचे स्वरूप सुचवतो. क्षितिजावर चमकून जाणारी तेजाची लहर त्यांची कविता जपून ठेवते आहे.

या अंतर्मुख वृत्तीमुळे जल्लोष आणि गजबज यांना ओलांडून त्यांची कविता निसर्गाच्या शांत रूपाची उपासना करते. अशा या शांत वेळी स्वर जुळून यावेत असे त्यांना वाटत रहाते. हे निसर्गाच्या शांत रूपाचे केवळ बाहेरून केलेले वर्णन नाही. इथे व्यक्त होते आहे आंतरिक वृत्ती.

ह्या शांत शांत वेळी
स्वरही जुळून यावे
ह्या शांत शांत वेळी
कुणि शांत गीत गावे.

या कवितेत येणारा 'हळू' हा शद्ब ही काव्यवृत्ती सूचित करणारा आहे.

ह्या शांत शांत वेळी
कमळे हळू फुलावी,
निद्रिस्त मानसाला
हळुवार जाग यावी,

हृदयास भावनांनी
हळुवार साद द्यावी

सौंदर्य निर्मितीत अंतर्भूत असलेली कोमलता, हळुवारपणा विमलाबाईंना अभिप्रेत आहे. या हळुवारपणातच " अन् काव्यकल्पनांची बरसात गोड व्हावी " असे त्यांना वाटते. याच भावनेने आपल्या ' जायचे पलीकडे ' या कवितेत त्या म्हणतात;

आसमंत जिथ शांतशांतसे
असेल का भवती सुंदरसे–
तिथे जायचे पलीकडे मज
जिथे नसावी उगाच गजबज.

अशा या गजबज नसलेल्या शांत सरोवरासारख्या ठिकाणी विमलाबाईंच्या मनाचे दिव्यत्वाशी नाते जुळते. हा दिव्यत्वाचा स्पर्श काव्यांतून व्यक्त करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. गाणे ऐकतानासुद्धा हाच शांत–सखोल अनुभव त्या घेत असतात.

मिटल्या नयनी शांतपणाने
ऐकावा जोगिया
आणि खुलावे अंतर त्याने

निसर्ग असंख्य रूपांनी व्यक्त होत असतो. सूर विविध भावना मनात जाग्या करू शकतात. परंतु निसर्गाची विशिष्ट रूपे स्वरांचे विशिष्ट आवाहन एकाद्या व्यक्तीच्या अंतःकरणाला जागे करते. या रूपातून हा अनुभव घेणाऱ्या व्यक्तीचे मन प्रकट होत असते. हे मन बाहेरच्या निसर्गाशी स्वरांशी, रंगांशी आपला संवाद साधीत असते.

विमलाबाईंच्या निसर्ग कविता असाच आंतरिक संवाद व्यक्त करतात. आणि म्हणूनच सायंकालीन उदासता जरी त्यांच्या मनाला जाणवली तरी त्यांचे मन या आंतरिक संवादामुळे या उदासतेवर मात करते. या कविता संग्रहाच्या प्रारंभी आपले मनोगत व्यक्त करताना विमलाबाई लिहितात; "मी उदास होते, निराश होते, पण हतबल होणे मात्र मला पसंत पडत नाही". उदासतेवरची ही मात नुसत्याच जिद्दीने केलेली नाही. अनेक सुखदु:खांनी, आशा-निराशांनी भरलेले हे जीवन सहजतेने स्वीकारण्याची शक्ती यामागे आहे. 'भैरवी' या कवितेच्या शेवटी विमलाबाई म्हणतात.

सुखदु:खांच्या विविध छटांनी आयु असे हे भरले
असंख्य आशा, अगणित अनुभव, स्मरते सगळे सगळे
आलासे पण शेवट आता– मन होऊ दे शांत
रंगुन जावो गोड भैरवी करण्याला अन् अंत

हा शेवट मनाने पहाताना ही शांतवृत्ती कशी निर्माण होते ? अखेर सुचवणारी ही भैरवी 'रंगुन जावो' असे म्हणण्याचे सामर्थ्य कुठून लाभते ?

हृदयाच्याही होत चिंधड्या
भावनाहि गुदमरली
चहुबाजूला अंधाराची
कळा भयानक दडली

हे भोवतालचे वास्तव जाणवत असतांनाही "रंगुन जावो गोड भैरवी" ही तृप्त-समंजसवृत्ती कशी उमलते ? या प्रश्नाचे उत्तर विमलाबाईंनी निसर्ग आणि आपले आंतरिक जीवन यांच्यात साधलेल्या संवादात

आहे. या संवादातूनच त्यांची श्रद्धा आणि त्यांची कविता यांचा जन्म होतो. 'हा गार गार वारा' या कवितेत विमलाबाई लिहितात :

येतो कसा कुठूनी, नकळे कुणा दिशेने
या सर्व आसमंती त्याचेच ते वहाणे.

या आंतरिक संवादाचे अस्तित्व "या सर्व आसमंती त्याचेच ते वहाणे" असे जणू त्यांना जाणवते.

एकाद्या जीवाभावाच्या माणसाशी आपल्या सुखदु:खांच्या गोष्टी कराव्या त्याप्रमाणे विमलाबाई कवितेतून आपल्या भावना व्यक्त करतात. निसर्गाच्या दर्शनाने आनंद झाला की त्या कवितेजवळ येतात. कधी विलक्षण एकाकी वाटते, अनामिक भयाची कालवा–कालव हृदयात सुरू होते ; अशा वेळी मनातल्या या आर्ततेला कवितेतूनच वाट मिळते. विमलाबाईंनी निसर्गाशी जसा हृदयसंवाद साधला आहे. तसाच कवितेशीही तो साधला आहे. आपल्या मनातले हितगुज सांगताना जो एक मनमोकळा सुहृद्भाव व्यक्त होतो तोच विमलाबाईंच्या कवितातून जाणवतो. या अभिव्यक्तीत शालीन सहजता आहे. कुठेही भडक रंगांचा स्वत:कडे अवाजवी लक्ष खेचून घेणारा वापर नाही. 'उंच कड्यावर' या कवितेत एकाकीपणाचे आर्त चित्र विमलाबाईंनी रेखाटले आहे. हे चित्र विलक्षण सहज, स्वाभाविक आहे. कसल्याही प्रकारच्या सहानुभूतीची दाद मागण्याचा जराही प्रयत्न या कवितेत दिसत नाही.

उंच कड्यावर उभी एकली
आणि बावरी दृष्टी झाली,
सोसाट्याचा वारा सुटला,
देह थरथरे वेळोवेळा

असे या एकाकीपणाचे सूचक चित्रण कवितेच्या प्रारंभी येते. मनात भयाची कालवाकालव सुरू आहे. भोवती बघण्याची हिंमत होत नाही. कुठे नजर टाकली तर 'दऱ्यादऱ्यावर थिजली दृष्टी' असा अनुभव येतो. गात्रे थकून गेली आहेत. आणि शेवटी ? कवितेच्या शेवटी विमलाबाई आशावादाचे नकली नाटक करीत नाहीत, या एकाकी पणाची सोबत तशी टाळता येणार नाही, भावजीवनातील ते एक अटळ वास्तव आहे याचा समजूतदारपणाने विमलाबाई स्वीकार करतात. या स्वीकारात कसलीही आदळआपट नाही, आक्रस्ताळे भावनाप्रदर्शन नाही, कवितेच्या प्रारंभी येणारे उंच कडचाचे प्रतीक अधिक अर्थगर्भ होऊन कवितेच्या अखेरीस येते.

दरीकपारी डोंगरमाथे,
अंबर वरती उंच उंच ते,
आणि उभी मी उंच कड्यावर
उभी एकली उंच कड्यावर

इथे कडा उंच आहे. डोंगरमाथे उंच आहेत, अंबर उंच आहे यातील उंच हे विशेषण पुन्हा पुन्हा येते आणि 'उभी एकली' या शब्दातून व्यक्त होणारी भावना उत्कट करते. एकलेपणाचे स्पष्टीकरण, समर्थन न करता भोवतालच्या निसर्गाच्या पार्श्वभूमीवर या एकाकी-पणाचा खोलपणा विमलाबाईंनी अतिशय सूचक कलात्मकतेने व्यक्त केला आहे.

विमलाबाईंनी एकाकीपणाचा हा अनुभव प्रत्ययकारी शैलीत व्यक्त केला आहे. पण म्हणून हा एकाकीपणा आपल्या कवितेचे किंवा भावजीवनाचे व्यवच्छेदक लक्षण असल्याप्रमाणे त्यांनी सारखासारखा

घोषविलेला नाही. जीवनातला ऊन-पावसाचा, छायाप्रकाशाचा खेळ त्यांना ठाऊक आहे, आणि म्हणूनच जेव्हा आशेचे खेळकर, प्रसन्न किरण मनात पडतात त्यावेळी ही सुखकर चाहुलही त्या उत्कटतेंने व्यक्त करतात. 'सूर्यास्त' या कवितेत त्या म्हणतात.

अस्त जाहला सूर्याचा
पण दूर कुठेसे दिसले
आकाशी ते चंद्रबिंबही
फिकटफिकटसे हसले.

या कवितेप्रमाणेच 'ये गरजत मेघा' या कवितेत मेघाला आवाहन करताना त्या लिहितात.

तृप्त जलाशय, तृप्त तरुलता, तृप्ति देइ सरितेला
दुथडी भरूनी वाहू लागो, येवो दिव्य तजेला
पाचूंचे हिरवे हिरवे रान खुलू दे सर्वकडे,
बरसू दे जलधारा अन् हर्षच जिकडे तिकडे.
तृणधान्यांनी शेत फुलू दे विकसित होवो आशा
ये गरजत ये ये मेघा, घालव सर्व निराशा,

उंच कड्यावर या कवितेची 'ये गरजत मेघा' या कवितेशी तुलना करून पाहिली असता, वेगवेगळे अनुभव व्यक्त करताना त्या अनुभवाप्रमाणे विमलाबाईंची शैलीही कशी वेगवेगळी रुपे धारण करते ही गोष्ट आपल्या ध्यानात येते. विमलाबाईंनी मिळवलेले हे कलात्मक यश आहे.

केवळ व्यक्तिगत भावनांच्या कोषात विमलाबाई गुंतून पड-लेल्या नाहीत याची साक्षही त्यांच्या कवितेत आढळते. आपल्या

भोवतीच्या समाजजीवनाकडे त्या डोळसपणे पहातात. अन्याय आणि शोषण यांच्या विरुद्ध लढून समतेचे राज्य स्थापण्यासाठी लोकमानसात पेटलेला क्षोभ विमलाबाईंना जाणवतो.

जाग आली मानसाला
जाग आली मानवाला
एकवेळी शांत असणाऱ्या
हृदयांतरि वादळ उठले

अशी या नव्या जागृतीची चाहूल विमलाबाईंना जाणवते. जागा झालेला माणूस आजवर निद्रिस्त होता. आपली केविलवाणी गरिबी, आपले हीनदीन जीवन तो लाचारीने भोगत होता. सर्व तऱ्हांचे अपमान हा शोषित मानव झेलत होता. पण आता परिस्थिती बदलली आहे. आपल्यावर अन्याय करणाऱ्या बेगुमान शक्तींची चीड त्याला आली आहे.

डोळीचे उडता झापड
वदनावर येत तजेला,
ते जीवन मरगळलेले
त्याची हो शकले शकले,
कष्ट कष्ट कुठवर केले
आज तेहि ध्यानी आले

आणि अशी ही जाणीव हृदयात जागी होताच या माणसात झालेला बदल विमलाबाई किती समर्थपणे व्यक्त करतात पहा.

अंगार फुलत ते नेत्री,
वळती त्या बळकट मूठी,

स्फुरत बाहू लढण्यासाठी
अन्याया टक्कर देती.

बदलत्या मूल्यांची, नव्या समाजजागृतीची अशी तेजस्वी जाण विमलाबाईंनी आपल्या कवितेतून व्यक्त केली आहे या दर्शनामुळेच. विमलाबाई उद्याच्या समाजाचे आदर्श चित्रही प्रभावीपणे रंगवू शकतात 'या छबड्यांनो' या कवितेत असे सुंदर चित्र त्यांनी रेखाटले आहे. आपली सारी धडपड असे जग निर्माण करण्यासाठी असली पाहिजे, उद्याच्या पिढीसाठी असे हे सुंदर जग निर्माण करण्याची आपली जबाबदारी आहे असेच जणू अप्रत्यक्षपणे ही कविता सुचवते, "जिकडे जावे तिकडे माझी भावंडे आहेत" असे म्हणणाऱ्या केशवसुतांच्या कवितेशी ही कविता आदर्शाचे नाते जोडते. उद्याच्या पिढीसाठी जे जग निर्माण करायचे आहे त्या जगात माणुसकीचा मुडदा पाडणारे क्षुद्र भेद नाहीत, माणुसकी हीच या जगातली जात आणि धर्म;

जात धर्म वा कुठलाही
भेद इथे ना कसलाही
मानवता ही जात इथे
मानवता हा धर्म इथे.

उद्याच्या जगाचे असे मनोमयदर्शन विमलाबाईंनी अंतःस्फूर्तीने घेतले आहे.

माणसाला माणसाविषयी वाटणारा निर्मळ प्रेमभाव, ममता हेच मानवी जीवनातले श्रेष्ठ मूल्य आहे अशी विमलाबाईंची श्रद्धा आहे. माणूस सामाजिक– राजकीय आदर्शांच्या घोषणा करतो, परंतु

प्रत्यक्षांत मात्र जीवनातील श्रेष्ठ मूल्यांचा बळी देत स्वार्थ साधत असतो. अशा या दांभिकतेतून शेवटी मिळते काय ? संस्कृती, राष्ट्रभक्ती या गोंडस नावाखाली पेटणारी संहारक युद्धेच अखेर या दांभिक घोषणा करणाऱ्या माणसाच्या वाट्याला येतात. विमलाबाईंना याची जाणीव आहे. त्या म्हणतात;

मज नकोच वैभव उगाच दांभिक सारे
मज नको फुकाचा मान वृथाच पसारे,
धनदौलत मोठी हवी कशाला मजला ?
पण मायाममता मिळोत मात्र मनाला
मज नको लागण्या दांभिकतेचा वारा
पण असोच साथी सत्याचाच उबारा.

या माणूसकीला, सत्याला आदर्श मानून विमलाबाईंच्या कवितेने आजवरचा आपला प्रवास केला आहे.

आता संध्याछाया त्यांना गडदपणे जाणवू लागल्या आहेत. मन कातर होऊ लागले आहे.

वार्धक्यापुढती असे नमविले हे शीर मी आजला
दृष्टीला न दिसे कधी जवळचे सारेच माझे मला
गेले धैर्य गळून पार सगळे, पाऊल टाकू कसे ?
जायाचे पुढती परी मजपुढे अंधार सारा दिसे!

अशी निराशा त्यांच्या मनाला ग्रासू लागली आहे. आयुष्याच्या उत्तरार्धात अशी निराशा जाणवणे स्वाभाविक आहे. परंतु निराशा हा काही विमलाबाईंच्या मनाचा स्थायीभाव नव्हे. ते क्षणकाल

मनापुढे येणारे पटल आहे. विमलाईंचा खरा सूर आनंदसौंदर्याचा आहे. या आनंदसौंदर्याची साधना त्या रंग–स्वर–शब्द या माध्यमांतून करीत आल्या आहेत, हे निराशेचे पटल त्यांच्या स्वराला ग्रासणार नाही असा मला विश्वास वाटतो. विमलाबाईंनी 'कोकिळेस' या कवितेत लिहिलेल्या ओळी ह्या संदर्भात सर्व रसिकांच्या वतीनें त्यांनाच ऐकवाव्यात असे मला वाटते.

नको बाई ग नको खिन्न होऊ
सुरू कर तू तव गीत कुहूकुहू
कंठ फुटु दे गे तुझ्या अंतराला
मधुर आळव तू गोड गोड ताना.
गडे ऐकव तू गींत कु हू कु हू
आणी आम्हीही तृप्ततृप्त होऊ.

— मंगेश पाडगांवकर

# रसिका – !

रसिका घ्या हा मुजरा.
हृदयिं फुलूं दे भाव फुलोरा.
गुण-अवगुण मोल तयांचे –
तुम्हीच सगळें ठरवायाचें.
अर्पित आहे तुमच्या चरणीं –
काव्य फुलें ही धुंद होउनी.
स्वीकारावीं प्रमुदीत मनीं
आशा राहे हीच मन्मनीं.
अंतर माझें साधें भोळें –
कणाकणांनीं मी ओतियलें.
धकित मन परि माझें होई–
पसंत पडतिल काय तुम्हां ही ?
काव्य सुमांची पखरण निर्मळ –
उधळुन दिधली-तुम्हा पुढें तर
रंग नसूं दे- गंध नसूं दे
निर्मल भाव परी राहू दे.
हंसक्षिर न्यायानेही
वाइट सारें द्या सोडूनी
गूण घेउनी दोष सोडणें –
हेच असे लेखक मागणें !

22336
काव्य
(स्थळ प्रत)

# सायंतारा

हांसत नाचत आला- उदयां सायंतारा
क्षितिजावरतीं चमचमतो अन् - झोंक दावितो न्यारा.
हितगुज चाले क्षितिजाशाशी - मूक मूक भाषेत
काय जगाला तमा ? असे तें चूर आपुल्या नादांत

रुणुझुणु पैंजण वाजत पायीं - आली नाचत तारा
आणि जगाचा नूर बदलला - बघतां बघतां सारा
सायंतारा पहात होता - सगळें सगळें कांही
मनांतून हो खिन्न - परीही बोलत नाहीं कांहीं

म्हणे मनाशीं - अशीच आहे जगताची रीत-
गुलाब फुलतां - फुलतें यौवन शब्द झेलला जात -
गुलाब सुकले - गंध निमाला - तेज लयाला जात-
पाठ फिरविली जगताने मग लगेच तिकडे श्रांत

येत चांदणी नभांत जेव्हां - नाचत लाजत न्यारी
खुले जगाची कळी - हांसतें गोड मोड तें भारी
सायंतारा - सायंतारा - कशास देखुनि कोणी-
कशास होइल लुब्ध ? जायचा तो तर क्षणि लोपूनी

क्षितिजाच्या शय्येवर पहुडे सायंतारा शांत-
थकलीं गात्रें - सुकले अश्रू - खलास यौवन होत.
मूक जाहली भाषा - झाली निस्तेज नजरही त्याची-
पण क्षितिजावर लहर जातसे चमकुन क्षण तेजाची.

# दिव्यत्वाची अमर ज्योत तूं—

दिव्यत्वाची अमर ज्योत तूं –
पावित्र्याची अमर ज्योत तूं –
कोटिकोटिंची हिंद भूमि तूं –
मांगल्याची शांतमूर्त तूं –
    प्रणाम तुज गे करिती सगळे –
    रूप तुझें गे दिव्य आगळे
    हिमाचलाचीं अभेद्य शिखरे –
    करिती तुजला सदैव मुजरे –
कुशींत तुझिया विसावून ना –
वाहत जाती गंगा यमुना –
जिथें रंगली रामसीतेची –
कथाच साक्षात् पावित्र्याची.
    घडला जेथें इतिहास तथा –
    हिंदभूमि ! तव स्वतंत्र्याचा
    संगमरवरीं स्वप्न रंगले –
    ताजमहालीं मूर्त जाहले.
प्रेमिकांचया अमर प्रीतीचें –
झालें स्मारक मूर्तिमंत तें –
तुझ्याचसाठीं वीर सज्जले –
तुझ्याचसाठी बलिदान दिलें.
    तुझ्याच दिव्यत्वाचीं गाती –
    मंगलगीते सर्वंकडे ती.
    धन्य खचितची धन्यधन्य तूं –
    दिव्यत्वाची अमर ज्योत तूं.

# ह्या शांत शांत समयीं –

ह्या शांत शांत वेळीं –
स्वरही जुळून यावे
ह्या शांत शांत वेळीं -
कुणि शांत गीत गावें
ह्या शांत शांत वेळीं –
कमळें हळू फुलावीं –
निद्रिस्त मानसाला –
हळुवार जाग यावी.
निश्वास मी कळ्यांचे –
कानीं कुणां पडावे –
पाऊल वाजलें कीं –
झंकार नाद यावे.
स्वरलुब्ध मनसाला –
मोहून गीत जावें –
रंगलुब्ध लोचनांनीं –
रंगांत दंग व्हावें.
हृदयास भावनांनीं –
हळुवार साद द्यावी –
अन् काव्यकल्पनांची –
बरसात गोड व्हावी.
रेखून चित्र जावें.
अन् धुंद धुंद व्हासें
हर्षीत रोमरोमीं –
मधुस्वप्न कीं भिनावें.

# जायचें पलिकडे—

पलीकडे– पलिकडे कुठेंसें–
जायचें पलिकडे दूरसें
क्षितिजाच्याही पलीकडे–
अन् सागराच्या पलीकडे,
दिसेल जेथे शांत सरोवर
गहिरें पाणी सुरेख निळसर–
सोनेरी कमळें – थाटानें
फुललीं असतिल गंध भरानें
गभीरता जेथें भरली–
दिशादिशांना वेढुन गेली.
दिव्यत्वाशीं नातें जेथें –
जुळलेंही जाइल तेथें.
अमर होतसे जिथें सर्वदा–
आत्मा देहा करुनि समर्पण.
जिथें कुणाचा पदन्यासही
कानावर ना ऐकूं येई.
असेल कां पक्ष्यांची किलबिल ?
असेल कां फुलवंती फुलवेल ?
आसमंत जिथ शांतशांतसे–
असेल कां भंवतीं सुंदरसे–
तिथें जायचें पलीकडे मज–
जिथें नसावी उगाच गजबज.

# जोगिया -

पहाट झालीं - कानीं आले -
सूर जोगियाचे -
करुणरम्य परि - मंजुमधुरही -
सूर जोगियाचे.
जोगिया जोगिया
दर्दभरी जोगिया -
कुणा हृदयिच्या - अबोल भाषा -
जागवतो जोगिया.
आळविता जोगिया -
झंकार उठत हृदयीं -
त्या आर्तआर्त सूरांनीं -
हळुवार जाग येई.
कोमलतेचीं कमळें फुलवित -
कोण जोगिया गाई -
ऐकुन स्वर तो जाग उषेला -
हळूं हळूं येई.
मिटल्या नयनीं - शांतपणानें -
ऐकावा जोगिया.
आणि खुलावे. अंतर त्यानें
असा हा करुणरम्य जोगिया !

# भैरवी

मैफल झाली-अन् दुनिया हरखुन गेली -
भैरवीची अन् आलापी-गोड सुरू झाली
    राग पूरिया राग मारवा गायक गाऊन गेला -
    आलापांनी तानांनी मधु-रंगविलें मैफलीला -

सूर मिळाले - धुंद जाहलें आसमंत सारे -
घुमले फिरले - गोड सूर अन् वैभव दिसले न्यारे.
    पण नंतर झाली सुरू भैरवी अंतीं
    कोमल स्वर ते पसरूं लागत आतां आवती भंवती.

विरले हळुहळुं स्वर सगळे पण गोड पूरियाचे
वैभव सारें लोपत गेले धुंद मारव्याचे.
    सुरू भैरवी झाली - आणिक लोक रंगले तींत.
    धुंद जाहले सारे - आतां गोड भैरवीत.

वातावरणी घुमले रमले सूर भैरवीचे -
छेडित गेले हृदयाच्या अन् तारा सूर कधीचे.
    मैफल सरली - शेवट झाला गोड भैरवीनें
    धुंद मनानें रसिक परतले - आळवीत गाणें.

सुख दुःखांच्या विविध छटांनीं आयु असें हें भरलें
असंख्य आशा - अगणित अनुभव - स्मरते सगळें सगळें.
    आलासे पण शेवट आतां - मन होऊं दे शांत -
    रंगुन जावो गोड भैरवी - करण्याला अन् अंत.

# वेड्या मना

वेड्या मना- विसर आस तुझ्या हृदींची
ती आस पूर्ण न कधीं तव व्हावयाची.
पाठीं नको मृगजळा चुकुनीहि जाऊं
तें व्यर्थ व्यर्थ फसवें- नच आस ठेऊं.

ते स्वर्णरंग दिसती तुज दूरदूर-
नाहींत ते परि तुझ्या करिं लागणार-
धावूं नकोस कुठल्याहि सुखाच पाठीं-
सोडूं नको सरळ मार्ग तुझा कदापी.

राखून ठेव आपुलें स्पृहणीय स्वत्त्व,
ती ठेव एकच- असेंच तिला महत्व,
विश्वास ठेव हृदयांत गुणी जनांचा -
अन् पूजनींच असुंदे स्वर सग्दुणांचा.

खोटें अहेपण नको हृदयीं वसाया
ना दंभ वा कटुपणा नचही असाया.
जें ना तुझें त्वरित सोडुन दे तयास-
टेंभा कधीं स्वगुणता मिरवून नकोस

प्राधान्य दे सतत तत्वगुणास आधी -
हांसो कुणी - परि तमा नच ठेव त्याची.
सोडूं नको क्षण भरींहि परिश्रमांना -
हा मार्ग एकच तुवा बघ आक्रमावा.

# अभिमान –

जात कुठें अभिमान –
माणसा जात कुठें आभिमान ?
तारुण्याच्या ऐन वैभवीं –
फुलला जो अभिमान –
जात कुठें तो ? आज पळाला –
कसा कसा अभिमान ?
सरलें वैभव तारुण्याचें –
सरली हिम्मत सारी.
दिमाख गेला – ताठा गेला –
मान खालतीं झाली.
अभिमानानें मिरवित कैसा –
होतासी त्या वेळीं –
आजच कां पण – खरंच सांग हं
होई त्याची होळी ?
दुर्बल झालें शरीर – गात्रें
निखळुन सारीं गेलीं
आणि मनाला कशाकशानें
ग्लानी तव आली ?
हृदयाच्याही होत चिंधड्या –
भावनाहि गुदमरली.
चहुबाजूला अंधाराची –
कळा भयानक दडली.
अंधाराच्या ह्या साम्राज्यीं –
कसा उरावा अभिमान ?
रीत जगाची – वार्धक्याचा –
होत खरा अपमान.

# अहंकार

कुणा तरी हृदयी एका - अहंकार होता भरला-
हे मी केलें ते मी केले - मीपणाच अंगी रुळला,
जगती नाहीं - कुणी स्वतासम - असाच केला दावा,
तुच्छ लेखुनी सर्वजनांना - सदैव केला कावा
मी मोठा अन् मीच शहाणा - मीच आणि सर्वगुणी
माझ्या पुढतीं सर्वांनीं - लोटांगण घ्यावें चरणीं,
प्रासादीं वास्तव्य तयाचें - चैन मौज अगणित चाले-
डोळ्यांवरती सदाच धुंदी - दारीं वाहन सजलें,
शोक मौज नी नाच-तमाशा - रुळलेल्या संवयीं-
कशास जाई - कधी असा हा - चालत पायीं पायी
चंचल लक्ष्मी - एके दिवशीं गेली परि सोडोनी-
अवती भंवती भुतें जमविलीं - तींही जात पळोनी,
विचारीत ना मुले-बायको - सारी दूर जहालीं-
अपमानित तो- आज तयाला किंमत कसली उरली ?
डोळ्यावरची उतरे धुंदी - अहंकारही सरला-
आणि आज तो जगांत अगदीं - लाचारहि ठरला !

# हा गार गार वारा—

हा गार गार वारा- अंगास झोंबणारा-
हा गार गार वारा— हृदयांस कांपणारा,
येतो कसा कुठूनी— नकळे कुणा दिशेने-
या सर्व आसमंती- त्याचेंच तें वहाणें,
त्या वृक्ष तरुलतांना— उमळून हाच देतो—
फुलल्या कळ्या फुलांना- उधळून पार देतो,
गगनांत विहरणाऱ्या- पक्षास उंच नेतो-
मेघास दे गती हा वारा कुठें ठरे तो ?
हा गार गार वारा- अष्टौप्रहर कीं वाहें-
तनु कांपवी कुणाची- स्वच्छंद फार आहे,
हा गार गार वारा— अंगावरून जाई—
अन् गोठल्या मनाला— शहरून टाकतोही
येतां प्रचंड वेगें— हा गार गार वारा-
भयभीत चित्त होतें— न मिळे कुठें निवारा,
सोसाट वाहतोहे- वाराहि गार गार
क्षिति ना तया कुणाची— कधि काय वाटणार ?
पण ये असाच ये ये— वाऱ्या असाच ये ये—
उमळून देह टाकी— एका क्षणांत पाहे-
आहेस कां दयाळू— पण तूं गडे खराच ?
तर हो प्रसन्न-आतां - वेगांत ये खरेंच.

# मज हवी शांतता

मज हवी शांतता –
शांतता – शांतता – शांतता
निस्तब्ध शांतता –
मज हवी शांतता
ते ' नकोच कुठले –
ध्वनी कर्कश कानीं येणें '–
पक्ष्यांची किलबिल परी –
ऐकूं दे स्तब्धपणें,
तो घोंघवणारा वारा –
ध्वनि त्याचा पिसाट तसला
छे ! नकोच कानीं याया–
शांतता भंग कराया
मेघांची भयद गर्जना –
बीजेचा दिमाख ही –
छे ! नको नको आतां –
हौस तशी उरली नाहीं
पण शांततेंत ही पडु दे –
कानावर सूर सतारीचे –
धुंद सूर – धुंद नूर –
तल्लीन परी होऊं दे,
शांततेत परि कानावर
स्वर येवो कोकिळेचे –
फुलणाऱ्या कमळांचे –
गुंजारव भ्रमरांचे
हा अफाट जनसागर –
हे कर्णकटू आवाज
नको नको ते आतां.
मज हवी शांतता !

# तीं सरलीं स्वप्ने

तीं सरलीं स्वप्नें – खरंच खरंच तीं विरली–
रंगेली ती दुनिया – केव्हाच लयाला गेली.
तो सूर्य उगवला अन् – अंबर चढुनी गेला–
पण अखेर त्याचाही – अस्त कसा कीं झाला.
आकाशीं भरलेले – सोनेरी तांबुस अन्–
रंग बदलले सारे सारे – आणिक ते पटकन्
बरसत होतें वरुन चांदणें – लोपून परी गेले–
ढगाआड अन् चंद्रबिंब परि लपतां स्वप्न विराले–
विकसित होती – गुलाब पुष्पे – बिखरुन तीही गेली–
संध्याराग पळाले अन् काजळी धरेवर आली,
गुलजार कुसुंबी रंग – परि आज फिके ही पडले–
कानावर येणारे – मधुर सूर तेही थकले,
बदलल्या कशा कीं – छाया दिशादिशांना
बदलले भावही – अन् अंतर बोलेना–
पक्षिगणांचे थवे पांगले – आकाशी उडणारे–
आणि तयांचे मार्ग होत ते – आतां सर्व निराळे
तीं सरली स्वप्नें – खरंच सर्व विलया गेली–
नेत्रावरची झांपड आणिक – पार उडोनी गेली !

# यशोदायिनी –

यशोदायिनी कलादेवते –
आनंददायिनी दयिते –
तुज वंदन मी करिते –
आशीर्वच दे माते.
कणांकणांनी केली पूजा –
गोड मानुनी घेशी –
श्रीमंत गरिब भेदभाव –
नाही 'तुजपाशी'.
कधी कधीं तूं उधळुन देशी –
प्रसाद मुक्त करांनीं –
प्रसन्न होशी कधीं कधींही –
कधीं कधीं पण रुसून बसशी.
मानवाच्या अंतरी गे –
प्रकाश तूं टाकिसी –
मानवाच्या अंतराला –
कधीं तजेला देशी.
मानव्य मानवाचें –
तूंच एकही जाणसी –
दुष्ट जनांच्या क्रूर लोचनीं –
अश्रू तूं आणिसी.
किमया तव ही अशी –
कलादेवते तुझीच ही –
हलका माणुस – तुझ्या कृपेनें –
थोर परी हा होई.

# पैलतीरावर –

पैलतीरावर उभा सख्या तूं –
ही सरिता मधुनी वाहे.
पाणी गहिरे – अथांग विस्तृत –
पात्र किती हे आहे. ?
नाव न दिसते कुठें कुठें ही –
माझ्या ह्या नयनांना –
पोहूम जाण्या असमर्थ मी –
येऊं कशी मी सजणा ?
बरसत वरुनी जलधाराही –
भिजवित अंगोपांग –
थरथरते तनु – वाऱ्या नेही –
कशी येउं मी सांग ?
मेघ गडगडे – कडकडते अन् –
बिजलीही रोषानें.
एकच चाले एक भयाचें –
वायूचेंही गाणें.
दिसतात मला त्या स्पष्टस्पष्टही
तूंच खुणा केलेल्या –
तव नयनींच्या मृदुल भावना –
त्या थकुनी गेलेल्या.
स्वर ये कानीं – अधीरही मी –
पण अंतर तें फार,
ऐलतीरावर उभी असे मी –
उभाच तूं पैलतीरावर.

# सुकली पुष्पें –

सुकली पुष्पें ही –
परत कधीं हंसतिल कां ?
सुंदरसा रंग कधीं –
परत आतां शोभायाचा ?
वेलीच्या अंकावर –
परत कधीं येईल बसतां ?
कोणाच्या डोळयांना –
आल्हाद कधीं देइल कां ?
कुणि ललना केसा मध्यें
परत तया माळिल कां ?
प्रभुचरणी अथवा –
त्यांस कुणी वाहिल कां ?
निर्माल्य म्हणूनी कोणी –
कोणी त्यां फेंकिल अंती –
ना रंग नसे वा शोभा –
कुठली आशा राहत कां ?
सुकलीं पुष्पें पण –
सुगंध त्यांचा लपेल कां ?
दरवळल्या दाहि दिशा –
सौगंध हीच ही आशा.
रंग नसे – जीव नसे
ह्यांस नसे जरि शोभा –
परिजपून ठेवी कोणी –
हुंगीत गंध कीं त्यांचा.
सुकलीं पुष्पें ही जरी –
सौगंध होय अमर परी –

# वैभव

दावुं नको ग वैभव तव ते –
जरि वैभवात तू लोळसी –
मूर्त तुझी ती सखे गोजिरी –
नटुनी थटुनी असशी.
साज चढविला स्वर्णमयी तू –
लाखमोल जरी तो असे –
नटशी सजशी जगा भुलविण्या –
नर्तन चाले तुझे कसे ?
तुझिया सदनी – सजली शोभा –
लाखमोल वस्तूंची –
नर्तन चाले नौबत झडते –
तुझ्याच दीव्यत्वाची.
घराभोवती बागहि सजली –
लयलूट असे पुष्पांची
बसशी मग कां एकलीच –
सांग सांग कां झुरशी ?
ती बघ आली तुझ्याच दारी –
कुणी बापडी उभी राहिली –
कटिवर होतें बाळ चिमुकलें –
त्यावर कां तव नजरहि खिळली –
हात पसरते तुझ्याच पुढती –
भीक मागते पोरासाठी.

डोळ्यांत करुणरम्य भाव कीं –
आंजारी गोंजारी बाळासी.
आणि नेत्रिं तव अश्रु चमकले –
खळकन् खालीं कीं ओघळले ?
आणि बोललें तुझेंच मन तें ?
" वैभव वैभव – आणि काय ते ? "
वैभवात लोळते मी खरी–
पण दीप नसे कीं माझ्या घरी–
छे! तुच्छ असे हें सारें वैभव
मोलच याचे – वैभव अभिनव.
ओवाळून जरी माझे सारें–
वैभव ह्यावरुनी टाकियलें –
तरी तुच्छ तें माझे वैभव–
दीपक ह्या हें खरेंच वैभव !

# क्षितिजावरतीं –

क्षितिजावर संध्याच हांसते
क्षितिजावर ही उषा लाजते.
क्षितिजावरती चाले खेळ –
कुणी उधळला गुलाल लाल– ?

लाल गुलाबी गुलाब फुलले
सोनेरी वा फुललीं कमळें.
क्षितिजावरतीं सायंकाळीं –
स्वर्णमयी त्या छटा मनोहर –

रौप्य रसाचा कधीं कधीं तर
हात फिरवला, दिशादिशावर.
क्षितिजावरतीं मीलन होई –
आकाशाचें अन् धरणीचें
रात्रीलाही शोभा येई –
अंधुक अंधुक प्रकाश होई.
अफाट सागर–शेवट त्याचा –
अखेर क्षितिजावरीं व्हायचा.

# उंच कडयावर

उंच कडयावर उभी एकली –
आणि बावरी दृष्टिहि झाली.
सोसाटयाचा वारा सुटला –
देह थरथरे वेळो वेळा.
भंवतीं बघण्या हिंमत नव्हती –
दऱ्यादऱ्यांवर थिजली दृष्टि.
थरथरतीं अन् गात्रें थकलीं –
मस्तक भ्रमलें–आस पळाली.
सोसाटयाचा तसला वारा –
दिशांदिशांना – कोंपविणारा –
दाहि दिशांना भ्रमतां भ्रमतां –
कुठें न देई जरा निवारा.
पदर उडाला – कशी सांवरु ?
भरे हुडहुडी – कशी निवारुं ?
गरगरतें मस्तक – खालीं बघतां –
क्षणाक्षणाला वाटे चिंता.
दरी कपारी–डोंगर माथे –
अंबर वरतीं उंच उंच तें.
आणि उभी मी उंच कडयावर –
उभी एकली उंच कडयावर !

# सृष्टीचें वैभव-

पाहिलेंत कां सृष्टीचें – वैभव तें मोहविणारे ?
तें निळें निळें आकाश – त्याला ना आदि न अंत –
चमकत त्या रात्रीलाही – चांदण्याहि नीलाकाशीं.
चंद्रम्यास येई जाग – फुलले अन् आंगणबाग.
ते डोंगर छोटे मोठे – वेढीत धरेला सजती
तरुलता वृक्ष भंवतालीं – एकच कीं गर्दी झाली.
उत्तुंग शिखर एकादें – तें पर्वत माथ्यावरचें –
चुंबतें जणू आकाशा – देवतांस वा भेटतसें
सरिताही वळतांवळतां – वाहतात स्वच्छंदानें
प्रीतीचें मंजुळ आळवी – इतक्यांतच निर्झर गाणें.
दरिकंदर घुमती सगळें – स्वच्छंद गोड गीतानें.
कवढसे पडत सूर्याचे – हांसरे नाचरे चिमणे.
सूर्यफुलें वंदन करितीं – उंचावुन आपुल्या माना
सूर्यदेव घेइ ते मुजरे – पसरवून स्वर्ण किरणांना.
कमळें हीं फुलली कोठें – शांतशा जलाशयपृष्ठीं
नाचतीं थवे भृंगांचें – भंवताली घेऊन गिरकी
पाहिलेंत वनराजींत – कळप ते खुले हरणांचे
पशुपक्षी शोभा देती – वैभव हें खरच सृष्टीचें.
ऋतु वसंत येतां गाती – कोकिळा कुहूंचें गान
फुलवीत फुलांच्या रांगा – उधळतात सप्तम रंग.
वर्षेच्या आगमनानें – सृष्टीस चढावा साज –
पाचूंच्या हिरव्या रंगी – थबकतात थेंब न थेंब.

जलधारा अंत:पटही – धरत शुभ्र शुभ्र मंगलसा.
चंचल अन्  बिजलीहि – निजदिमाख दावी खासा
हेमंताची चाहुल लागुन – पार निघून गेली –
अन् शिशिराची नवी शिरशिरी – हुर हुर लावुन गेली !
बरसत ते वरतुन कीं – पुनवेचें चान्दणें
युगुल चकोरांचे अन् – मीलन मधु कीं होणें.
खळखळतो सागर तो – अफाट पसरलेला –
शांत कधी – रौद्र कधी – आवेग तयाचा न्यारा.
घे मुजरा सृष्टीसती – अतुलनीय वैभव तव हें
कोटिकोटि स्वजनांचे – तुज लाखमोल वंदन हें !

# सागरा ! –

शांत कधी– स्तब्ध कधी– रौद्र रुप कधीं घेशी –
अफाट तव विस्तार सागरा अगम्यही तूं असशी.
सागरा ! शांत सागरा ! स्तब्ध स्तब्ध सागरा –
सौम्य रूप – शांतमूर्ति – भव्यरूप गभीरा.
चंद्रकिरण अमृतमय हृदिं तव विसावती –
सूर्यबिंब तळपत वरि– उज्ज्वल करि कांती.
उदरांत किती लाखमोल–लपत रत्नकें अमोल–
ठाव न ये कसलाही – असशि किती तू खोल.
उदार तू– पृष्ठावर कितीक नौका नाचविशी –
दूर दूर प्रांतांतुन– हिंडे मानव – तव हिम्मतीनिशी.
पण कधीं टाकुन तूं– सौम्य रुप हे देशी –
अन् बदले नूर तुझा– क्षणी उग्र कीं होशी
रौद्र दिसे रूप तुझें– तांडव नृत्य कीं चाले –
लाटांवर लाटा उसळुन– रुप तुझें हों आगळे.
शांतपणे तरणाऱ्या– कापत नौका भीतीने –
भयदायी लाटांनी भीतिग्रस्त अन् होत जिणें.
उठतें वादळ– तुझ्याहि देहीं– संतप्तहि हो तूंही
भयदायी गर्जत अन् – लाटा नाचत तव देहीं.
मानवही धैर्यानें तोंड तयाला देई परी
चुकलें तारु–तरी तयाला पोचवितो किनारीं –
निसर्गास अन् देउन टक्कर हटविलें तुला सागरा–
शरणागति पतकरुनी तूं– हटलास मागे जरा.

पण नतमस्तक रहाशील कां सांग सागरा आता ?
येइल कां तव उफळुन वरती – परत सागरा माथा ?
कोपेल कधीं निसर्ग अथवा – जेव्हा होईल रोष तयांचा
उसळतील कां उत्तुंग तुझ्या त्या उंच उंच लाटा ?
मानव बांधी उंच उंच हे– गगनाला भिडणारे –
प्रासाद नवनवे – हटवुनि तुजला– चुंबाया तारे –
दिमाख त्यांचा राहिल कुठवर– कोप तूझा मग होतां –
सांग सागरा – सांग काय तें – भवितव्य तयांचे आतां !

# सूर्यास्त-

ते सूर्यबिंब लपलें अन् – क्षितिजाच्या आडहि गेलें –
सजवीत परी सृष्टीला – रक्तिमाहि देउनि गेलें.
ते सांध्यराग अन् – सर्वकडें पसरत गेले –
जणु रक्तवर्ण जरतारी – सृष्टीला वसन मिळालें.
आकाश जाहले लाल – आसमंतही लाल –
लज्जेचा बुरखा जणू – घेत सृष्टी बहुमोल
त्या सुंदर वातावरणी – त्या शांत पार्श्वभूमींत –
धवल शुभ्र बगळ्यांची – मळ उडे झोकांत –
मंदमंद वाहत वारा – शांत शांत हो सर्वकडे –
सुखकर वारा, सुखकर शांती – हर्षच इकडेतिकडे.
वृक्षलतांनी – दिवसभरीच्या श्रमभारांनी थकले –
देह आपले – पांगुळले अन् – घेत विसावा सगळे.
पण अर्पियला सायंसमयीं – सुगंध आपुला प्रेमें –
सर्वकडे तो भरुनी गेला – प्रसन्न चित्त भरानें.
दुरुन कुठूनी ऐकूं आला – रंगत होता पुरिया –
आणि सुरांनी उभावला मग – दूरदूर दर्या.
अस्त जाहला सूर्याचा – पण दूर कुठेसें दिसलें –
आकाशीं तें चंद्रबिंबही – फिकट फिकटसे हंसले !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
22330
दा. क. ७१४८४
2३४८
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# रात्रींच्या समयीं–

रात्रींच्या समयीं
जेव्हां अवनी निजली
श्रमशांत होउनी
जेव्हां दुनिया थकली.
फुले झोंपली शांत–
कळचा झोंपल्या शांत–
जग सर्व धुंदीत–
झोपेच्या होतें घोरत.
त्या शांत शांतशा वेळी
जाग कुणा पण येई
अवखळ अन् तारांचा–
नभि नाच चाललाही,
पुनवेची चांदरांत–
बरसत सागर हृदयीं
लाटांचा घुमणारा–
ध्वनि कानावरतीं येई.
क्वचित कुठें रातकिडे–
एकस्वर चाले त्यांचा–
अंधारीं चमकुनी–
काजवे – देत प्रकाशा,
पण शांत शांत ह्या वेळीं–
मानवास जेव्हां ये जाग–
गति मिळे विचारा तेव्हां
आपुल्याच मनि हो दंग !

# आई— !

यशवंत गाउनी गेले – तें दिव्य गीत ‘ आई ’ –
परिसरांत घुमले आणि – स्वर तेही ‘ आई आई ’.
दर्दभरे गात कुणीसा – परत परत तें गीत –
हंबरडा फोडुनी कोणी – आईस्तव कीं रडतात.

स्मृति कितीक भरलेल्या – आईच्या दिव्यत्वाच्या
बहरून येत प्रीतीच्या – आईच्या मृदु स्पर्शाच्या –
आईच देवता झाली – आईच सावली झाली.
बाल्यांत हरविलेल्या – आईच अमर कीं झाली,

आईविण काय असावें – दुजें कोठलें मौल्य ?
आईविण काय जपावें – आईविण रुततें शल्य.
आकाशीं भरली आई – दशदिशांत भरली आई –
सर्वकडे भरली आई – आईसम कोणी नाहीं.

अपराधहि पोटीं घाली – वात्सल्य माउली तीच –
कारुण्यमूर्तिही तीच – आधार देतसे तीच.
ती तीच धीर देई – हंसविते रिझविते तीच
आईसम कोणी नाही – मांगल्य आणि आईच.

उपदेश अमृता पिऊनी – आईनें गोड दिलेल्या –
जग अंबर चढुनी जाई – मिळवुनिया येत यशाला.
ती देत विसावा आई – ती देत सर्व कांहीं –
आणि गीत सर्वकडे – भरलें तें ‘ आई आई ’.

# ये गरजत मेघा –

ये गरजत मेघा येथे – संतप्त जाहली धरणी –
ये पाऊस घेउनि येथे – अन् शांत होउं दे अवनी
सूर्यकरांनी धरा तापली – चोहिकडे पसरे ऊन्ह
शीतसिंचना करुन एकदां – घालव सगळा शीण,
चमकुन जावो वक्रांगी ती – बिजलीही आकाशीं
लखलखाट हो दाहिदिशांना – त्या दिव्य प्रकाशीं,
गरज गरज तूं – रूप घेउनी कुठलेही ये न्यारें,
काळोख पडो धरणीवरती – गडगडाट किति होऊं दे,
कडकडाट हो वीजेचाही – आक्रंदन भयदायीं –
पण घेउन ये मेघा सत्वर – वर्षाधारा तूंही,
जलधारांनीं नाहूं देही – पृथ्वी अविरत मेघा –
सिंचन हो अमृतमय – घेऊनि ये अनुरागा,
तृप्त जलाशय – तृप्त तरुलता – तृप्ति देइ सरितेला,
दुथडी भरूनी वाहूं लागो – येवो दिव्य तजेला.
पाचूंचें हिरवें हिरवें – रान खुलूं दे सर्वकडे –
बरसूं दे जलधारा – अन् हर्षच जिकडे तिकडे,
तृणधान्यांनीं शेत फुलू दे – विकसित होवो आशा –
ये गरजत ये ये मेघा – घालव सर्व निराशा,
आगमनाची तुझ्या सर्वही – कोण प्रतीक्षा चाले –
गरजत ये आक्रंदत ये – पण ये – अन् फुलव मळे,

# हे मातृ भूमि –

तुझ्याचसाठीं कितीक लढले वीर –
तुझ्याचसाठीं कितीक गळले तीर.
तुझ्याचसाठीं तुझ्या रक्षणासाठीं
तुझ्या पूजनासाठीं – तुझ्याच अब्रूसाठीं –
तुझ्याचसाठीं किती जणांनी आपुले –
प्राण अर्पुनी – सार्थक जीवाचें केलें.
स्वातंत्र्यास्तव – किती जणांनीं आपुली
प्राणपणानें आत्माहुतिही दिधली.
धन्यधन्य हे – मातृभूमि तूं खचित. –
धन्यधन्य कीं जयघोष – तुझाही होत.
हिमाचलाचे कडे हादरले तेव्हां –
शूरांनी बलिदान दिले ना जेव्हां.
हिमाचलाच्या – अश्रूंचीं – वाहे ही गंगा –
जलधारा अन् भिजवित तव आंगोपांगा.
फुलाफळांनीं भरल्या बागा दिसती –
विसावल्या कीं कुशींत तुझिया असती
सूर्यराज तळपतो – प्रकाश दिव्य तयांचा
दूरदूरुनीं विदेशीय ते घेती वेध तयांचा.
रंगाची मैफल पाहुन – नेत्र तयांचे दिपती –
हरतऱ्हा – हर प्रदेश बघुनि आनंदित होती.
आसेतु हिमाचल जगास दाखविती –
तुझीच रीती – तुझीच प्रीति – तुझीच नी कांती.
वंदन तुजला मातृभूमि तूं खचित धन्य धन्य –
तुजसमान जगतीं – कुणी कुणी ना अन्य !

# कशाला नीज ती यावी ?

कशाला नीज ती यावी ? कुणाही श्रांत हृदयाला
घेऊनी नीज कां अथवा – शांतता मिळे मानसाला ?
कशाला नीज ती यावी ? कशाला स्वप्न हो जागे ?
कशाला गुंफती कोठें – विचारांचे तसे धागे ?
कळेना मन्मना कांहीं – भडकतें कां उगा माथे ?
नीज का अंतरा यावी – जाग कां दूर अन् पळते ?
सुखाची नीज यावी पण – जागृतीही हवी मजला –
येऊं दे नीज परि जागें – राहु दे सतत चित्ताला.
घेऊ दे देह विश्रांती – जाणतें चित्त राहूं दे –
मानसाला नको नीज – स्वप्न हें मात्र पाहूं दे
दुर्दैव वेध घेणारें – स्वप्नही नको यायाला –
शांतता लाभण्यासाठी – जाग यावीच चित्ताला.
स्वप्न तें पाहण्यासाठी – येऊं दे नीज ती देहीं –
जागतें राहु दे मनही – कशाला नीज ती यावी ?

# जाग आली मानवाला -

जाग आली मानसाला –
जाग आली मानवाला –

एकवेळीं शांत असणाऱ्या –
हृदयांतहि वादळ उठलें –

खडबडून अन् मानस –
दचकूनच जागें झालें.

निद्रिस्त आजवर होतें –
तें अंतर जागें झालें.

चलबिचल मानसीं होता –
मानव्यहि जागें झालें.

डोळींची उडतां झांपड –
वदनावर येत तजेला –

तें जीवन मरगळलेलें –
त्याची हो शकलें शकलें.

कष्ट कष्ट कुठवर केले –
आज तेहि ध्यानी आलें.

अंगार फुलत तें नेत्रीं –
वळती त्या बळकठ मूठी –

स्फुरत बाहु लढण्यासाठीं –
अन्याया टक्कर देती.

अन्याय सहन ते केले –
आजवरी दीनपणानें –

अपमान आजवर गिळले –
सारे ते लाजिरवाणे.

गरिबीचें जीवन भोळे –
ओंगळ तें लेणें ल्यालें –

पण आज संपले सारें –
मन सिद्ध लढाया झाले.

जीवन मरणाच्या क्षितिजीं –
आज उभा मानव आहे –

तर एकच निश्चय एक –
जीत वा मरण कीं आहे !

# रंग असावे -

रंग असावे आंवती भंवती –
कित्येक विखुरलेले –
रंग दिसावे दृष्टीलाही –
इंद्रधनूनें सजले.
रंग दिसावे अंतचक्षूना –
भंवतालीं फेंकियलेले –
मानसासही इकडे तिकडे –
दिसोत रंगच पेरियले.
दुनिया आहे रंगाचीही –
रंग रंग भंवती सजले –
दिवसा रंगत रात्रीलाही –
रंगत रंग निराळे.
किमया भरली – सर्वकडे अन् –
रंगत सजली दुनिया.
काळोखांतहि रंग दिसावे –
अवनीला सजवाया.
सजली धरती – सजलीं रानें–
सजलेंही आकाश –
रंगरंगुनी आसमंतही –
रंगतसे रंगात.
सूर्यकरांनीं जादू केली –
आणि रंगली धरणी.

झाडें लतिका – सूर्यफुलें अन् –
शोभा रंगे असली.
रंग गुलाबी – लज्जाभावा –
सजवाया येतो –
आणि रक्तिमा रम्य उषेला –
संध्येला शोभवितो
रंग पाचूचा हिरवा हिरवा
वृक्षलता पेहरतात
आकाशी सप्तरंग ही –
किती कितीदा फिरतात.
निळा जांभळा – पीत तपकिरी –
काळाही शोभा देतो –
नील नभाच्या पार्श्वभूमिवर
बलाकमाला खुलवीत.
रंग असावे आंवतीं भंवतीं –
सदैव ते खुलले –
रंगू दे रंगांत विश्वही –
फुलवित नेत्रांचीं कमळें.

# पाठलाग –

प्रिय डोळ्यांनों कशास करता –
पाठलाग अजुनी हा ?
कशास येतां मागेंमागे –
खरंचहि सांगा मजला ?
एक मार्ग हा – जीव एकला –
वेडा भोळा दुबळा –
सरळपणानें पुढें चालला –
ध्येयामागें कुठल्या.
विश्वास नसे कां सांगा मजला -
संशय कां मम आला ?
छे ! छे ! नाहीं तसें कांहिंही –
कधींच तो तर बुडला.
कशास बोलूं असलें कांहीं –
खरंच खरंच पण चुकलें मीही –
पाठलाग तो असाच चालो –
प्रिय डोळ्यांनों तुमचाही.
सदैव मजला जरूर तुमची –
आधार असो तुमचा –
जाग जागते – चाल चालते –
करतांनाही काम –
प्रिय डोळ्यांनों दर्शन होतें –
तुमचें अहोरात्र नाम.
तुम्हीच आशा – तुम्हीच दीपक –
तुम्हीच सारें कांहीं –
जागृत राहुन – करा असाची –
पाठलाग अष्टौप्रहरीं.

# एका सायंकाळी—

एका सायंकाळीं येथें–
मयुरनृत्य दिसलें होतें.
अतृप्त अशा डोळयांचें–
पारणेंहि फिटलें होतें.
उभवीतहि रम्य पिसारा
वाऱ्यानें थरथरणारा–
मयुरीच्या मृदुभावांना–
मोहवून हांसविणारा.
होय मयुर तोच तो येथे–
नाचला खरंच स्वच्छंदें.
मयुरीही रमली होती–
हर्षांत बुडुन आनंदें.
आकाशीं जमले होते–
नवनवीन सप्तम रंग.
क्षिति नसुनी कसलीही–
नर्तनांत आपुल्या दंग.
एका सायंकाळीं येथें–
विहगवृंद जमले होते.
त्याच त्याच सायंकाळीं–
आसमंत फुलले होते.
स्वरमिलाफ जमला होता–
स्वर जुळुनी आले होते.

आणि त्याच सायंकाळीं–
सांध्यराग खुलेले होते.

वाऱ्याच्या झोतानें अन्–
थेंबथेंब उधळुनि नेलें.

आणि कुणा जीवाचें–
अंगअंग शहरुन गेले.

जाइजुई फुलल्या होत्या –
उधळीत गंध भंवतालीं –

पुष्पांची दुनिया सगळी –
हंसली नटली सजली.

त्याच त्याच सायंकाळीं –
दोन जीव प्रेमवेडेही –

विसरून जगाला गेले –
प्रेमगीत गातांनाही.

# संध्या – छाया

त्या सुंदर संध्या – छाया –
झेंपावत पृथ्वीवरतीं –
त्या शांत शांत वेळीं
शांतताच केवळ होती
अन् शब्द न ये कोणाचा –
कानावर आजुबाजूने –
सूर न ये पक्षांचा –
मग कसलें कुठलें गाणें ?
पेंगुळल्या संध्याछाया –
भिववीत जगाला सगळ्या –
अंधारुन जातांना –
पृथ्वीवर क्षणभर स्थिरल्या.
त्या त्याच संध्याछाया –
क्षणभरांत मोठ्या झाल्या –
अन् थोड्या निमिषांतच –
विलीन अंधारी झाल्या.

# थांब जरा—

थांब जरा– थांब जरासा–
क्षितिजावर घेत विसावा.

दे आणिक मजला–
थाट तुझा चंद्रा भगवा.
एकचित्त होउन मी
तुजकडेच पाहे जेव्हां–

मन थक्क होउनी जातें
शीतल तव मुखडा पाहून
पाहूं दे रूप तुझें–
क्षणभर मज न्याहाळून
म्हणत डाग चंद्रावरचे.
दिसत कुठें पाहूंदे ते.

छे! कलंकशोभा परि ती–
तव काया भूषित करती.
कुणि तुझा प्रांत तुडवीला–
कुणि स्वप्नभंग कीं केला.
आकाश यानिं बैसोनी--
जिंकियले तुजला कोणी ?

एक गोड स्वप्न कीं विरले–
रसिकांचे भाव निमाले.

मानव तव किमया दिसरे
प्रेम लोभ टाकुनि सगळे
चांदोबा तूं बाळांचा
प्रीतिचंद्र–प्रेमिकांचा.

परि निरखुन शास्त्रज्ञांनीं
तव वैभव अवनत झालें
आकाशीं उंच दूरवरीं–
होतास भ्रमत आजवरीं.
मानव परि येत तिथेंही
भ्रमण करित यानामधुनी.

पण इतर जनां तूं अजुनी
चंद्रमाच असशी गगनीं
पाहुं दे क्षणभर तुजही–
थांब जरा चंद्रा डोईं.

## विश्वास !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ शाखा
दा. क्र. ९२३३७
ता. क्र. ३६
२३४८
(स्थळ प्रत)

विश्वास कुणावर ठेऊ ?
विश्वास कुठे मी पाहूं ?
नच उरलें आज जगीं या
विश्वास असें ठेवाया.

नच उरला लव आधार
साशंका अपरंपार
नैराश्य विफलताभाव –
हीच उरे हृदयीं ठेव.

पण तरीहि अंतर बोले --
सोडुन दे हे भाव खुळे --
विश्वास नकोही ठेऊं
अवलंबुन अथवा राहूं.

विश्वास स्वत:वर ठेव
तीच खरी मौलिक ठेव
विश्वास राहुं दे हृदयी
हरवु नको तेथें कधिही.

अंतरिचा हा विश्वास
हीच खरी तुजला आस --
वाटचाल पुढची करता --
विश्वास तुझा गे यावा.

# कोकिळेस –

कुठें गेला तव सूर पंचमाचा –
सांग सखये कोकिळे सांग साचा ?
कुठें गेलें तव कुहुं कुहूं गीत ?
विरस झाला कां ? सांग एकदांच.

आम्रवृक्षांवर त्या तिथें बसूनी.
सूर कितिदां लाविला तूं रमूनी.
मोहर आम्राचा गळुन काय गेला ?
गंध अथवा कां दूर पळुनि गेला ?

कसें एकाकीं गीत तुझें थांबे ?
सूर जुळलेला काय तो विसंबे
शोक अथवा तुज काय सांग झाला ?
म्हणुन स्वर कां तव आज गे निमाला ?

नको बाई ग नको खिन्न होऊ –
सुरू कर तूं तव गीत कुंहूं कुंहूं.
कंठ फुटुं दे गे तुझ्या अंतराला –
मधुर आळव तूं गोड गोड ताना.

आम्रवृक्षावर बघ मोहोर येई
गंध त्याचा दरवळे ठायिं ठायीं
गडे ऐकव तूं गीत कुंहूं कुंहूं –
आणि आम्हीही तृप्त तृप्त होऊं.

## —निशिगंध—

उंच करूनी निशिगंध मान -- पाही --
गंध आणिक पसरवी दिशांनाही.
सांज झाली अन् फुलत कळ्या गोड.
आणि सर्वकडे दरवळे सुगंध,

शुभ्र चिमणीशीं फुले गंधदायी–
जवळ जवळीं असतात फुलत देहीं
कुणी ललना डोईत खोवताहे
कुणा देवाच्या पदीं धन्यता ये

साजशृंगारीं – कुणा मिळे मान--
कुणी सजविले कसें कुठें स्थान,
कुणी राही सजुनीच जागजागीं--
सुगंधाचा परि एक गूण अंगीं,

तृप्त होते मन पाहुनी तयाला
गंध निशिगंधा -- कुठुनि हा मिळाला ?
कुठेंही हा वसे -- असे -- शोभे --
गंध त्याचा परि दरवळे दिमाखे.

मान उंचावत सदा ऐटदार–
बघे भंवतीं निशिगंध मजेदार,
रंग नाहीं परि धवल कांति त्याची--
मोहवीते -- ती चमक धवलतेची.

# सावल्या—

मी पुढें चालले‍ं— माझ्या मागुन ये कोणी
पदरव नाहीं— मागमूस ना— येते पण कोणी.
कां कुणास ठावें ? मी मागें वळुनी पाहे—
पण कोण दिसेना— वाटे— स्वप्नच कां हें ?
परत पाहिलें मागें वळुनी— पण फक्त सावली दिसली
पाठलाग करुनिया एकसारखा मागे मागे आली.
सूर्य सरकतो पुढें पुढें अन् अंबर राही मागे
पण जादूची कांडी फिरती पृथ्वीतलावर रांगे,
घराघरावर जादू टाकुन सूर्य अंबरी धांवे—
तरूतरूंवर अंमल त्याचा नाचत खेळत आहे.
किती सावल्या घराघरांच्या धांवत त्याचेपायीं—
तरूतरुंच्या छाया नाचत अनुरोधाने त्याही
शांत जलाशय प्रकाशले जव सूर्याच्या किरणांनी
कधीं ढगांची पडे सावली पृष्ठभाग शामल करुनी—
कधीं थोरली— कधीं सानुली— कधीं असे ती व्यस्त
पाठलाग परि करी सावली मन होई संत्रस्त.
गिरिशिखरावर पडत सावल्या मेघांच्या वरतूनी—
प्रकाश-छाया खेळ चालला दिसतो सर्व ठिकाणीं—
पुढें चालला— तशी सावली— कधीं दिसावी पुढती—
कधी चालली तुमच्या— पाठुन कधि तुमच्या सांगाती.

# दूर जा - दूर जा -

दूर जा - दूर जा - दूर जा -
स्वप्नांनों दूर जा. !
आजवरीं मी बाळगिलेल्या -
स्वप्नांनों दूर जा. !
सागरतीरी विसावलेल्या --
स्वप्नांनों दूर जा !
उंच उंच डोंगरमाथे --
आजवरीं चढुनी गेलां --
चांदण्यांत शीतल मार्गे
कितिदातरि भटकुन आलां
पक्ष्यांच्या शुभ्र थव्यांनीं
धुंद गुंग तुम्हां केलें --
मधूर मधूर सूरांनींही --
वेड तुम्हां अन् लावियले --
पण आज सर्वही सरलें
जागीं अन् मीही झाले --
स्वप्न स्वप्न कसलें आतां ?
माथ्यावर सूर्यहि असतां --
विसरूं दे आज तुम्हांला --
विसरूं दे सर्व जगाला.
दूर जा म्हणुनही म्हणते --
तुमच्याशीं सरलें नातें.
दूर जा -- दूर जा -- दूर जा --
स्वप्नांनों दूर जा !

# चांदणे -

थबकलें चांदणें पाहुनिया पृथ्वीला -
गिरिशिखरें चुंबुनिया उजळितसे विश्वाला.
ये उधाण सागरास - लकलकती लाटाही -
अतृप्त मना - तृप्ति मिळे - किरणांनीं अमृतमयी.
धावल्य देत विश्वाला - हांसतसे चांदणे -
शांत शांत स्नेहमयी - वृष्टि करी मधुरपणें.

बहर येत प्रीतीला - प्रेमिकांच्या कुणा कुणा
विरही जन नि:श्वासा - टाकित ते पुन्हां पुन्हां

प्रेमिकांच्या प्रीतीला - ऊत ये क्षणोक्षणीं -
विरहाच्या दु:खव्यथा - येत वरी उभवोनी.

हर्षाचे कारंजे उडतांना दिसे कुठें -
वृक्षांवर वेलींवर - फुलत पुष्प सौख्य तें.

हांसवितें कोणाला - रडवितसे कोणाला
रसिकांना भुलवितसे - देउनिया सौख्याला

थबकताच चांदणें - हर्ष होत पृथ्विला
हर्ष होत सुखवितसे हासवितसे मानवाला

चांदणे चांदणे चादणेंच चहुकडे
वृत्ति येत बहरूनी - जन गुंगत सर्वकडे.

## या छबडयांनों —

या छबड्यानों -- खेळाया --
हात घालुनी हातीं या --
आहे हें तर सृष्टीचें --
आंगण मोठें प्रीतीचें.

इथे न भीति --
कसली भ्रांति --
रंगत प्रीति --

या या सारें इकडे या --
हांसा -- नाचा -- धांवत या.
जात - धर्म वा कुठलाही --
भेद इथें ना कसलाही --

एकच जाती --
प्रीती रीती --
मानव नीती --

मानवता ही जात इथे --
मानवता हा धर्म इथें.
तुम्ही सृष्टिचीं सर्व मुलें --
ज्ञानाचें भांडार खुलें --

ज्ञान संपदा --
लुटा सर्वदा --
खुलो हर्षदा

समतेचें हे दार खुले
सर्वकडे आनंद डुले,
बागुल बोवा जातीचा --
राक्षस तसला धर्माचा --
द्या मूठमाती --
या सर्वासी --
ऐक्य भावही.

एक नको तो विसराया
त्यानें पृथ्वीला सजवा
समतेचा हो जयजयकार --
ऐक्य एकही आलंकार.
लेउनि घ्या तो --
भूषण दिसतो --
तो शोभवितों

अहंकारही घालवितो --
सत्य ज्योतकीं पाजळतो.

# क्षण आला आला

क्षण आला आला – शेवटचा
क्षण आला आला – भाग्याचा
जगताशीं जडलें आजवरींचें –
संपत नातें – ऋणानुबंधांचें.
मोहमयी मृदु मायापाश
अन् सर्व सर्व सरली – खोटी आस.
प्रीतीच्या तारा सगळ्या – तुटोन गेल्या.
शृंगारसाज सर्व तसा – विसकटला.
दिली घेतली आजवर – प्रीति निमाली
केली संगत – रंगरंगलीं – स्वप्नें विरघळलीं,
हृदयाचें स्पंदन आतुर – आज संपलें.
बुद्धी थकली – गात्रें थकलीं – शांत सर्व झालें.
सरलें हंसणें – सरलें रडणें – भावना सरल्या –
संध्या लोपुन – अंधाराच्या – छाया झेंपावल्या.
कुठली आशा ? कुठलीं स्वप्नें ? संपत आलें सारें–
आंवतीं भंवतीं वाहत आहे – मृत्युचें वारें.
दिसायचीं ना पुष्पें – आतां कधींच.
दिसायचे ना दीप – विझाले ते कधींच.
सर्वकडे शांतता – निस्तब्ध शांतता –
कुठुन न येई आवाज कसला आता.
क्षण आला आला शेवटचा –
क्षण आला आला भाग्याचा.

# स्वर आले कानावर

स्वर आले कानावर–
गोड धुंद सतारीचें–
अन् धुंद होउनी गेलें–
मम मानस मुग्ध कधींचें

स्वर आले कानावर–
जादूनें भारून गेले
अन् अंतर सारे सारे–
तृप्त तृप्त होउन डोले,

दशदिशांत भरला नाद–
गुंगत जग-रंगत डोले–
सूर गोड सतारीचे
मन माझे मोहुन गेलें.

तंद्रींत तशा मी धुंद–
अन् जडला एकच छंद.
विसरले सर्व सर्वाला
हो मनांत धुंदफुंद.

आळवित राग रागांना
ती सतार रंगत होती
स्वर आले कानावर–
भावना खोल नी उठती.

मी नेत्र मिटोनी घेई
अन् चित्त वेधलें माझें

स्वर आले कानावर
दिडदाही सतार वाजे.

मज ओढून ने दूरवर
जागृत कीं स्वप्निं कळेना

लागली समाधी माझी,
ऐकत त्या स्वप्न सुरांना—

एकचित्त होउन गेले
स्वर्गीय स्वर कानीं आले—

स्वर कानावर कीं आलें—
मन धुंद-धुंद अन् झालें.

# मज नको –

मज नकोच वैभव – उगाच दांभिक सारें-
मज नको फुकाचा – मान वृथाच पसारे.
मज नको कोठली – सौवर्णांची खाण
मज नकोत – त्यांची मजपाशीं ना वाण

धनदौलत मोठी कशास व्हावी मजला ?
पण माया ममता मिळोत मात्र मनाला.
मज एक मिळू दे ऊब सदा मायेची
अन् पांखर राहो – सदैवही ममतेची.

मज नको लागण्या – दांभिकतेचा वारा-
पण असोच साथीं – सत्याचाच उबारा
जडतेची अवखळ – शृंखलाच तुटुनी जावो
अन् दास्यत्वाची – कोंडी दुभंग होवो.

पण राहूं दे मम – स्वत्व अंगिं भिनलेलें-
अन् राहूं दे ही – भंवतीं सात्विक आगळें,
मनि वसला खोटा – अहंकार जर असला
तो पळुनी जावो – खचित विरूं दे सगळा,

स्वाभिमान राहो भिनलेला हृदयांत–
अन् वाण तयाची नको कधीं जीण्यांत-

# कर माझे जुळती –

मानवा आज तुजपुढती –
खरंच हे कर माझे जुळती.
गेलास तूं हिमाचलाचीं –
उत्तुंग चढुनिया शिखरें

गगनात फडकविलासी
ध्वज हिंद तिरंगी डोले.
रान तुडवुनी कांटेरी तें –
जंगल मंगल केलें –

श्रमदानानें अखंड भूचें –
नंदनवन तूं केलें.
सागरावरी मात करोनी –
सात समुद्रां उल्लंघिलें –

भ्रमण करूनी विमानमार्गें –
पूर्वपश्चिमा जवळीं केलें.
हटवुनि सागर बांधियली तूं –
प्रासादांची रांग –

गगनचुंबि प्रासाद भव्यसे –
मन थक्क होउनी गेले.

प्राणपणानें अवकाशीं तूं
भ्रमण कितीदां केलें –

चंद्रावरतीं जाउन आणिक –
यशास मिळवुन दिधले.

धन्य धन्य तूं खचित मानवा
धन्य तुझी ती कीर्ति –

तुझ्या यशाची कमान बघतां –
कर माझे जुळती.

# हा वाजत गाजत आला –

हा वाजत गाजत आला–
चैतन्याचा वारा–
अन् वाजतसे चौघडा
घुमवित नादहि न्यारा.
हा सुगंध घेउन आला–
मोहवीत दाही दिशांना
सौगंध चहुंकडे भरला–
भारितसें शांत मनाला,
उभवीत पंख पक्ष्यांचे–
दे थरारून हा त्यांना
आकाशीं घेत भरारी–
पक्षीही उचलुन माना
हा वाजत गाजत आला
पर्जन्याचा मेघ
गडगडे, कडकडे बिजली–
काय तिचा थाट! दिमाख!
हा पाउस उधळुन देतो–
वीजेला नी वाकवितो.
अंधारून पृथ्वीलाही
हा क्षणांत का टाकियतो ?
घेऊन नवनवे रूप
हा वाजत गाजत आला
काय असे झोंक तयाचा
आगळाच त्याचा तोरा.

# सूर जुळुनी आले –

सूर सर्व जुळुनी आले –
आले ते मोहविण्याला
मन माझें गुंगुन गेलें –
ऐकून सुरांचा मेळा

कोमल ते मंजुळ ते
सूर सर्व मिळते जुळते –
मन धुंद धुंद कीं झालें
सूरांची किमया सजतां –

हृदयास भिडुन ते गेले –
दिव्य सूर गातां गातां.
येत कधीं जुळुन असे
क्वचित सूर चित्तासरसे

त्या दिव्य अशा सूरांनीं
मन उगाच गहिवरलें –
भिडले स्वर हृदया आणिक
नेत्र मात्र भरुनी आले.

## नकळत —

नकळत येई ऊर भरूनी
नकळत येई नीर लोचनीं.
नकळत येती उफळुन वरतीं –
हृदयीं दडल्या गत आठवणी.
नकळत नेई मज ओढूनी –
गतकाळाच्या श्रोत-प्रांगणीं.
जिथें विसावत बाल्य रम्यसें
जिथें दाटले सूर गोडसे.
मयुरांचे जिथ थवे नाचले –
फुलपाखरूं जिथें रंगलें.
हास्याला जिथ भरती होती
आनंदाची लयलूट आणिती.
पंख थरारून दूर उडाले –
जिथे पक्षि ते घरट्यामधले.
जिथें चंद्रमा नीलनभांतुन
हळूंच पाही डोकावून
प्रीतिचांदणे जिथें हांसलें –
जिथें प्रीतिचे गुलाब फुलले –
आज अचानक स्मृतिलहरींनीं
हृदय भारले उचंबळोनी –
नकळत आणिक दाटदाटलीं –
नेत्रिं आंसवे कीं थबथबलीं.

# घर....

घर असू दे छोटेसें -- घर असू दे मोठेंसें--
घर सजलेले असो – घर शृंगारलें नसो
मोठमोठ्या मौल्यवान – वस्तू त्यांत सोबतीला
निर्मलता राखूनही – येई घराला तजेला.

सौंदर्याने नटलेलें – घर असो मोठें भलें
पण एकलेपणाचें – तिथें जर झालें जिणें.
कोण येईना जाईना – कोण ढुंकून पाहिना –
छोट्या मोठ्या पाऊलांच्या – उमटतीना खुणा–

सौंदर्याचीच व्यवस्था – तेथें सदा जपलेली
परि येईना कानींकधी – कुणाचीही स्वरावली.
एकटेंच रहायाचें – एकटेंच फिरायचें–
एकट्यानें मूकपणें – सारें सारें सहायचें

अशा वास्तूला कधी कां ? घर अशी संज्ञा मिळे ?
अशा घरावर सदा – अवकळेचें भूत निळे.
घर तेंच – जेथें लोक – नियमित येती जाती–
तेंचि घर – तेंच भाग्य – जेथें उठतात पंक्ती.

स्वर कानीं येती जेथें – अनेकांचे – हास्याचे--
बालकांचे – गृहिणींचे – आणि आल्या गेल्याचे.
जेथें होते सदा – देवाण घेवाण सदा ती
तेंच घर – हास्याचे अन् जेथें फवारे उडती.
घराचें घरपण असे भरल्या घरांत–
पावित्र्याची -- मांगल्याची जेथ तेवतसे ज्योत !

# येथवरीं प्रवास झाला -

झाला येथवरीं प्रवास – अजुनी दूरीं किती जायचें ?
गेली शक्ति सरून आणि थकलीं काया – कसें व्हायचें ?
मागें पाहियलें जरा वळुनही – दृश्यें उभीं ठाकलीं –
छाया ती गतकालची मनिं भरे – गेली परी लोपली.

गेलें बाल्य सरून – यौवन सरे – सारें कसें गोजिरें
माध्यान्हीं भरलेंच पोक्तपण – तें – तेंही असें लोपलें
वार्धक्यापुढतीं असें नमविलें हें शीर मी आजला
दृष्टीला न दिसे कधीं जवळचें सारेंच माझें मला.

दृष्टी अंधुक जाहली – मग कशी आशा मला कोठली ?
येई शिथिलता तनूस – पडतें पाऊल कोठेंतरीं –
चित्ताला भ्रम जाहला – स्मृति नुरे चित्तांत कोठें कशी
जागीं राहुनही पडे मज कशी सर्वांचीहि विस्मृति ?

गेलें धैर्य गळून पार सगळें – पाऊल टाकूं कसें ?
जायाचें पुढतीं – परी मजपुढें अंधार सारा दिसे.
डोळे घेत मिटून मी – परि उभे अश्रू सदाचे कसे
त्यांच्या आडुनही समोर दिसतें अंधूक सारें जिणें

आहे कां नशिबीं कधीं उगवता तो सूर्य आतां भला ?
आशा कीं नव चंद्रकोर कुठली देईल शक्ती मला ?
मृत्यू, देइल हात काय सहजीं– विश्वास यावा कसा ?
छे ! हें काय कसें कधींच घडणें– शंका– मनीं सर्वदा.

# शेवटीं—

शेवटीं धन्यवाद–
रसिकहो धन्यवाद !
आज खरे तुम्हां–
मित्रहो धन्यवाद !
आशीर्वच देणारे–
वडिलधारे धन्यवाद !
सर्व उपकार दाते–
तुम्हां धन्यवाद !
शुभ चिंतणारे–
लोकहो धन्यवाद !
गूण जाणणारे–
सुजनहो धन्यवाद !
आज शेवटच्या क्षणीं–
देऊं दे धन्यवाद !
सहकारी मित्रांनो–
मैत्रिणींनो धन्यवाद !
हा मानाचा मुजरा –
अखेरचा धन्यवाद !
लोभ असू द्या –
प्रेम असू द्या – धन्यवाद !
संपलें सर्वही सरले –
एकच उरे – धन्यवाद !

# चुकीची दुरुस्ती

पाडगांवकरांची प्रस्तावना.

पान १२ – ओळ शेवटची

‘आणी’ – ऐवजीं, ‘आणि’ पाहिजे.

पान ३९ – कविता – ‘थांब जरा

ओळ ३ री – ’ दे आणिक ऐवजीं–

‘पाहूं दे आणिक मजला–’ असें पाहिजे.

दा. क्र.
REFBK-0022337
REFBK-0022337